॥ ज्योतिर्मय ॥
Online Journal of Literature....
साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ८४ वा ❑ शुक्रवार दि.०९ मे २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

# पाकिस्तान पुन्हा हादरला

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

भारत पाकिस्तान मधील तणाव शिगेला पोहोचला असतानाच आता पाकिस्तानमध्ये बॉम्बस्फोट होत आहे. पाकिस्तान आपल्या पापाच्या कर्माची फळे भोगत आहे. शेजारी देशांमध्ये दहशतीच्या माध्यमातून हिंसा घडवून आणणारा पाकिस्तान स्वतः बॉम्ब स्फोटांनी हादरून गेलेला आहे. पाकिस्तानमध्ये भीतीचे वातावरण इतके आहे की तिथून वारंवार स्फोटांच्या बातम्या येत आहेत. या संदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. पाकिस्तानातील कराचीमध्ये मोठा स्फोट झाल्याचा दावा केला जात आहे. लाहोरमध्ये झालेल्या स्फोटानंतर काही तासांतच हा स्फोट झाला. गुरुवारी दुपारी स्फोट झाल्याची बातमी समोर आली. काही स्थानिक स्रोत आणि सोशल मीडिया पोस्टमध्ये हा क्षेपणास्त्र हल्ला असल्याचा दावा करण्यात आला आहे. भारताच्या ऑपरेशन सिंदूर कारवाईनंतर वाढत्या तणावादरम्यान ही घटना घडली आहे.

पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतात मंगळवारी एका लष्करी तळावर तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) या दहशतवादी गटाच्या आत्मघाती हल्लेखोरांनी केलेल्या दुहेरी स्फोटांमध्ये आणि सुरक्षा दलांनी केलेल्या प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात किमान २१ जणांचा मृत्यू झाला. ठार झालेल्यांमध्ये १५ नागरिक आणि सहा दहशतवादी होते. मीडिया रिपोर्टमध्ये ही माहिती देण्यात आली आहे.

बन्नू येथील रुग्णालयातील अधिकाऱ्यांनी सांगितले की, या स्फोटांमध्ये चार मुले आणि दोन महिलांसह किमान १५ नागरिकांचा मृत्यू झाला तर २५ जण जखमी झाले. सुरक्षा दलांनी सांगितले की बन्नू कॅन्टोन्मेंटवर एक मोठा दहशतवादी हल्ला उधळून लावण्यात आला आणि त्यांनी टीटीपीशी संबंधित किमान सहा हल्लेखोरांना ठार केले.

खरं तर, हे स्फोट अशा वेळी झाले आहेत जेव्हा एक-दोन तासांपूर्वी लाहोरमध्येही जोरदार स्फोट झाले होते. लाहोरमध्ये एकामागून एक तीन बॉम्बस्फोट झाले आहेत. पण कराचीमध्ये एक स्फोट झाला आहे. कराचीमध्ये सायरन वाजत असल्याचे वृत्त आहे आणि शहरातील अनेक भागात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

आतापर्यंत, पाकिस्तानी अधिकाऱ्यांकडून किंवा लष्कराकडून या स्फोटांबद्दल कोणतीही पुष्टी मिळालेली नाही. तथापि, पाकिस्तानी माध्यमांच्या वृत्तानुसार, या भागात सुरक्षा दल तैनात आहेत आणि सामान्य लोकांना जवळ येण्यापासून रोखले जात आहे. स्फोटांनंतर कराचीमध्ये अलर्ट जाहीर करण्यात आल्याचे वृत्त आहे आणि स्थानिक लोकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

तळांवर हवाई हल्ले...

यापूर्वी, ७ मे रोजी ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारताने जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबाच्या तळांवर हवाई हल्ले केले होते. बहावलपूरमधील मरकज सुभान अल्लाह आणि मुरीदके येथेही हल्ले करण्यात आले.

पाकिस्तानने या हल्ल्यांना युद्धाचे कृत्य म्हटले आणि प्रत्युत्तर देण्याची धमकी दिली. पण तो काहीही करू शकला नाही कारण भारतीय सैन्य पूर्ण सतर्कतेने पाकिस्तानला योग्य उत्तर देत होते.

## लक्षवेधी छायाचित्र....



कोणतेही लढाऊ विमान नसून हा सागरी किनाऱ्यावर आढळणारा वेस्टर्न रीफ एग्रेट्स (एग्रेटा गुलारिस) पक्षी आहे
(छाया : संजय दारमवार, मुंबई)

# २१ बटुंचा सामुदायिक उपनयन संस्कार थाटात संपन्न

## सलग चौथ्या वर्षी मंडळाने हा उपक्रम यशस्वी पणे पार पाडला

ज्योतिर्मय साहित्य
छत्रपती संभाजीनगर /संजय व्यापारी :

दिनांक ०२/०५/२०२५ रोजी देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण समाजाचा उपनयन संस्काराचा उपक्रम छत्रपती संभाजीनगर येथील सप्तपदी मंगल कार्यालयात यशस्वी रित्या पार पडला. सलग चौथ्या वर्षी मंडळाने केलेल्या या उपक्रमांत २१ बटु चा सहभाग होता. मंडळाने पालकांची केलेली राहायची व्यवस्था, मातृभोजन व्यवस्था, पूजा विधी व्यवस्था, स्वागत व्यवस्था, भोजन व्यवस्था, पाणी आणि विजेची सोय उल्लेखनीय होती. सप्तपदी कार्यालयाचे प्रमुख गणेश कुलकर्णी यांनी यात विशेष मदत केली. मंडळाचे अध्यक्ष नरेश जोशी आणि महिला अध्यक्ष श्रीमती मोनिका ताई चौधरी या दोघांच्या नेतृत्वात मंडळाचे सर्व पुरुष पदाधिकारी आणि महिला पदाधिकारी स्वतःचे काम चोखपणे बजावत होते. रविंद्र जोशी व सौ. स्वानंदी जोशी यांनी उत्तम रित्या गुरुकुल देखावा केला होता. हे कार्यक्रमाचे वेगळे आकर्षण ठरले. वेद शास्त्र संपन्न मंदार कुलकर्णी गुरुजी आणि त्यांच्या सहकारी गुरुजींनी धार्मिक विधीचे काम यशस्वी रित्या पार पाडले. सर्व विधीचा अर्थ समजावून सांगितला. त्यामुळे सर्वांच्या आपल्या धर्म ज्ञानात चांगली भर पडली. बऱ्याच दात्यांनी या उपक्रमासाठी स्वखुशीने वस्तू आणि निधी स्वरूपात देणगी दिल्या. त्यांचे हे पवित्र कार्य खुप अनमोल ठरले. मंडळाला हा महत्त्वपूर्ण आशीर्वाद मिळाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगरचे भाजपचे उपाध्यक्ष व देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण समाज मध्यवर्ती मंडळ मुंबईचे नवनिर्वाचित अध्यक्ष भैय्यासाहेब गंधे व त्यांच्या पत्नी सौ. मीनलताई गंधे, उद्योजक रविंद्र वैद्य, शुभदा वैद्य (अर्धापूरकर), उपस्थीत होते. आपला ब्राम्हण समाज एकजुटीने राहून आपला धर्म जागृत ठेवू शकतो आणि स्वतःचा आर्थिक विकास करू शकतो याचे त्यांनी छान मार्गदर्शन केले. मध्यवर्ती मंडळ संभाजीनगरच्या मंडळाच्या पाठीशी मोठया भावासारखे कायम उभे आहे हे आश्वासन दिले. ज्ञानेश्वर माऊलीचे पसायदान म्हणून या कार्यक्रमाचा निरोप करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष नरेश जोशी वसेकर, महिला अध्यक्ष श्रीमती मोनीकाताई चौधरी, महिला कार्यकारीणी सदस्य मयुरी दाभाडकर, उपाध्यक्ष रवींद्र जेऊरकर, सचिव प्रशांत दाभाडकर, कोषाध्यक्ष अंबादास जिंतूरकर, प्रसिद्धी प्रमुख मिलिंद दाभाडकर, का. सदस्य – श्रीपाद मुगुटे, वैभव देशपांडे, नरेश पटवर्धन, गोपाळ कुलकर्णी, पदाधिकारी, पद्माकर कोटचिरकर, किशोर कस्तुरे, उमेश पारनेरकर, राजेश जोशी वसेकर, आर्यन जोशी वसेकर, महिला पदाधिकारी सौ. संध्या मुगुटे, सौ. कल्पना जोशी वसेकर, सौ. दीपा देशपांडे, सौ. सीमा कस्तुरे, सौ. उत्कर्षा पारनेरकर, सौ. विभा देशपांडे, सौ. रूपाली कुलकर्णी, सौ. जयश्री कुलकर्णी, सौ. शिल्पा दिक्षित, सौ. अंजली कोटचिरकर, सौ. प्रिया कुलकर्णी, कु. समृद्धी चौधरी, कु. मानसी दाभाडकर, कु. साक्षी दाभाडकर,कु. श्रुती पारनेरकर यांची उपस्थिती होती.









# सहकारी साखर कारखान्याचा लोकइतिहास म्हणजे 'सहकाराचा कल्पवृक्ष'


ज्योतिर्मय साहित्य

**'सहकाराचा कल्पवृक्ष' या प्राचार्य डॉ. वसंत ठोंबरे यांनी लिहिलेल्या ग्रंथाचे प्रकाशन आज रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री मा. नितीन गडकरी यांच्या हस्ते श्रीरामपूर येथे होत आहे, या ग्रंथाचे स्वागत करण्यास सर्वच अतिशय उत्सुक आहेत, गेली दहा वर्षे प्रा. ठोंबरे हे विठ्ठलराव विखे पाटील यांच्याविषयी संशोधन करण्यात अक्षरशः दंग झाले होते. त्यांनी या विषयाचा जणू ध्यास घेतला होता व आज तो पूर्णत्वास येत आहे याचा मला अतिशय आनंद होत आहे. या 'सहकाराचा कल्पवृक्ष' ग्रंथा विषयी थोडासा परिचय मी येथे देत आहे.**

**– डॉ. वि.ल.धारूरकर**
**ई–११०८, ग्लोरिया ग्रेस, बावधन पुणे**

सहकाराचे समाजशास्त्र ही एक नवी ज्ञानशाखा आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या विकासाचा ऐतिहासिक विकासाचा अभ्यास करताना हा दृष्टिकोन अत्यंत महत्वाचा ठरतो. कारण सामाजिक अर्थशास्त्रावर समाजहिताला प्राधान्य देऊन केल्या जाणार्या आर्थिक विकासाचा अभ्यास वैशिष्ट्यपूर्ण असतो. या दृष्टिने विचारकरता 'सहकाराचा कल्पवृक्ष' या ग्रंथाचे महत्त्व लक्षणीय आहे. प्राचार्य डॉ. वसंत ठोंबरे यांनी लिहिलेल्या 'सहकाराचे कल्पवृक्ष' या ग्रंथाचे स्वागत करण्यास मला अत्यंत आनंद होत आहे.

गेली दहा वर्षे प्रा. ठोंबरे विठ्ठलराव विखे पाटील यांच्याविषयी संशोधन करण्यात अक्षरशः दंग झाले होते. त्यांनी या विषयाचा जणू ध्यास घेतला होता. या विषयावर संशोधन करण्यासाठी त्यांनी दोन-तीन विद्यापीठांतून प्रयत्न केले. अखेर सुदैवाने ते ज्या पुणे विद्यापीठात शिकले, त्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात त्यांना संधी मिळाली आणि त्यांनी पाच वर्षे 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' या न्यायाने संशोधन करून या विषयाला अखेर न्याय दिला आहे. त्यांनी प्रस्तूत विषय अभ्यासासाठी निवडला याची तीन कारणे आहेत. पहिले म्हणजे ते महाराष्ट्राचे सहकारमंत्री कै. विनायकराव पाटील यांच्या नावाने स्थापन झालेल्या विनायक पाटील महाविद्यालयात इतिहास विभागाचे प्रमुख होते. मंडळाच्या गंगापूर येथील मुक्तानंद महाविद्यालयाचे ते प्राचार्यही होते. दुसरे कारण म्हणजे ते पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांचे नातू आहेत. आपल्या आजोबांचे ऋण आपण फेडावेत अशा पवित्र भावनेतून त्यांनी या विषयाचा ध्यास घेतला. तिसरे म्हणजे प्रा. ठोंबरे हे १९६७ साली पुणे विद्यापीठाचे इतिहास विषयाचे सुवर्णपदक विजेते होते. डॉ. अ.रा. कुलकर्णी यांच्यासारख्या नामांकित मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली ते इतिहास विषयात एमए झाले. तेव्हापासून त्यांचा पिंड संशोधकाचा होता. ते बाळासाहेब विखे पाटील यांची वारंवार भेट घेत. तेव्हा बाळासाहेबांचा संशोधन व ज्ञाननिर्मितीवर भर होता. बाळासाहेब विखे यांच्या प्रोत्साहनामुळे वसंतराव ठोंबरे यांनी हा विषय निवडला. त्यावर संशोधन कार्य आरंभिले.




माझा आणि बाळासाहेब विखे यांचा स्नेहभाव व मैत्री असल्यामुळे आम्ही अनेकवेळा भेटलो. तेव्हा त्यांनी ठोंबरेंना संशोधनासाठी मार्गदर्शन करा, सहाय्य करा असा आग्रह केला. बाळासाहेब विखे पाटील हयात असताना मी प्रा. ठोंबरे यांनी इंडियन हिस्ट्री काँग्रेसमध्ये 'द काँट्रिब्युशन ऑफ पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील फॉर डेव्हलपमेंट ऑफ कोऑपरेटिव्ह मुव्हमेंट ऑफ महाराष्ट्रा : अ न्यु लाईट ऑन सोशल हिस्ट्री ऑफ महाराष्ट्रा' असा शोधनिबंध सादर केला होता.

प्रा. ठोंबरे यांनी लोणी प्रवरानगर, श्रीरामपूर या भागात फिरून अनेक कागदपत्रे मिळविली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ तसेच देवगिरी महाविद्यालय, वैजापूर व गाणगापूर येथील महाविद्यालये त्यांनी अनेक दुर्मिळ ग्रंथ संकलित केले. ज्येष्ठ पत्रकार डॉ. गोपाळ निरीकर, प्रा. डॉ. अरुण साधू, माजी कुलकर्णी सर्जेराव निमसे यांच्याशी त्यांनी अनेकवेळा चर्चा केली. पुणे विद्यापीठातील विखे पाटील अध्यासनातील ग्रंथसामुग्री, चर्चासत्रे यांचाही त्यांनी लाभ घेतला. तसेच सहकारविषयक लेख, ग्रंथ आणि दुर्मिळ साहित्य याचा आढावा घेऊन त्यांनी हे संशोधन पूर्ण केले आहे. यासाठी मी त्यांना डॉ. धनंजयराव गाडगीळ यांची भाषणे व लेख, खंड १ व २ वाचण्याचा आग्रह केला होता. कारण डॉ. धनंजयराव गाडगीळ हे कुशाग्र बुद्धीचे अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांच्या आर्थिक चिंतनाचा व अभ्यासाचा फायदा महाराष्ट्रातील सहकारी चळवळीतील विश्वाला झाला आहे.

प्रा. वसंतराव ठोंबरे यांनी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारे व उपेक्षित पैलूवर प्रकाश टाकणारे काही लेखही 'सहकारीजगत' यासारख्या नियतकालिकातून लिहिले आहेत. शिवाय राजा मंगळवेढेकर, शिवाजी सावंत आणि अरुण साधू यांची सामुग्रीही त्यांनी साकल्याने अभ्यासली आहे. त्यांच्या सखोल अभ्यासाचे व चिंतनाचे प्रतिबिंब या ग्रंथामध्ये उमटले आहे. त्यांचे मार्गदर्शन प्रा.डॉ. विद्यासागर यांनीही त्यांच्या संशोधनाला यथायोग्य मार्गदर्शन केले आहे. ते ही प्रा. ठोंबरे यांच्याप्रमाणेच अभिनंदनास पात्र आहेत.




सहकारी चळवळीचा इतिहास हा लोकांचा आणि लोकचळवळीचा इतिहास आहे. एकोणिसाव्या शतकात महात्मा फुले आणि लोकमान्य टिळक यांच्या जागृतीमुळे महाराष्ट्रातील रयतेमध्ये म्हणजे शेतकरी वर्गामध्ये अपूर्व जागृती घडून आली. लोकमान्य टिळकांनी दुष्काळ, शेतकर्यांचे शोषण, सावकाराकडून होणारी नागवणूक इत्यादी ज्वलंत प्रश्नावर केसरी पत्रातून अग्रलेख लिहून लोकजागृती घडविली होती. 'कुणबीही मेला, सावकारही मेला!', 'देशी उद्योग बुडाले', 'बंदुकीच्या पेटत्या गोळ्याखाली झालेल्या शेतकर्याच्या सभा' यासारख्या ज्वलंत व स्फोटक अग्रलेखाने लोकमान्य टिळकांनी शेतकर्यांची दु:खे वेशीवर टांगली. महात्मा ज्योतीराव फुले यांनी १८८६ मध्ये लिहिलेल्या 'शेतकर्याचा आसूड' या ग्रंथात तत्कालिन महाराष्ट्रातील शेतकर्यांची दुरावस्था जबरदस्तपणे रेखाटली आहे. या ग्रंथाचा प्रारंभच त्यांनी 'विद्येविना मती गेली, मतीविना गती गेली, गतीविना वित्त गेली, वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले' अशी केली होती. या सूत्रामध्ये त्यांनी विद्या, मती, गती, वित्त यातील परस्परसंबंध सांगून आर्थिक दारिद्र्यामुळे व शिक्षणाच्या अभावामुळे सामाजिक प्रश्न कसे तीव्र होतात, त्याचे कठोर सत्य तीव्रपणे मांडले आहे. महाराष्ट्रातील सामाजिक इतिहासाचा हा पट समजून घेतल्याशिवाय सहकारी चळवळीच्या उदयाची कारणमिमांसा होऊ शकत नाही. कारण सत्यशोधक चळवळीमध्ये सहकारी चळवळीची बीजे शोधता येतात. महात्मा फुले यांचे अनुयायी कृष्णराव भालेकर यांनी धरणगाव येथे पहिली सहकारी सूतगिरणी स्थापन केली. दुष्काळाने ग्रासलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील दक्षिण भागात शेतकर्यांच्या स्थिती अत्यंत हलाखीची होती, हे चित्र बदलण्यासाठी पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी श्रीरामपूर तालुक्यात प्रवरेकाठी घरोघरी जाऊन शेतकर्यांना शेतकरी चळवळीचे महत्व प्रतिपादन केले. प्रथम प्राथमिक सहकारी कृषी सेवा पतसंस्था स्थापन केली. त्यातून शेतीसाठी शेतकर्यांना लागणारे भांडवल सहज उपलब्ध होऊ लागले.

**(क्रमशः)**



– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



आनंदी पहाट...

## वैचारिक प्रगल्भतेमुळे दृष्टीकोन बदलतो


ज्योतिर्मय साहित्य

दैनंदिन जीवन जगत असताना वर्तमानांत आपण काहीतरी शोधत असतो. हा शोध नेमका कशाचा असतो ह्याचा अंदाज अनेकदा आपल्याला येत नाही. खरं तर हा शोध आनंद प्राप्तीचा असणं आवश्यक असतं. अर्थात, प्रत्येकाची आनंदाची व्याख्या जशी निराळी असते, तशीच अनुभूती देखील वेगवेगळी असणं स्वाभाविक असतं. आपापल्या अनुभूती आणि प्रचीतीनुसार आपली आनंदाची व्याख्या तयार होत असते. आनंद आपल्या अंतरंगात निर्माण होत असतो. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारावर तो निर्माण कसा, किती आणि कधी होतो ? ते अवलंबून असतं.

अनेकदा आपल्या अंतर्मनातील विचारांमध्ये आपण गुरफटले जात असतो, अगदी न कळत होत असतं तसं. आपल्या अंतर्मनांतील विचारांना विशिष्ट दिशा, गती अथवा विषय असतीलच असं नाही. दिवसभरात आपल्या मनांत आलेले सर्वच विचार, तसं बघितलं तर, आपल्या लक्षात देखील राहतातच असं नाही. ह्या विचारमंथनात आपल्याला वर्तमानातील वास्तवाचं भान राहणं महत्वाचं असतं. पण भूतकाळाच्या साठवणीतील आठवणीत रमलेल्या आपल्या अंतर्मनाला दुसरीकडे भविष्याची काळजी, चिंता करायची देखील सवय जडलेली असते. आजचा दिवस माझा, ह्या भावनेतून, दृष्टीकोनातून आपले विचार, वर्तन आणि व्यवहार होण्याची जाणीव होत राहणं महत्वाचं ठरतं.

एकप्रकारे सकारात्मक वातावरण निर्माण होऊन आपली क्रयशक्ती वाढल्याची प्रचीती येऊ लागते. आपलं दैनंदिन काम करत असताना आपण नवीन व्यक्तीमत्वांचा परिचय करून घेण्याचं उद्दिष्ट साध्य केलं पाहिजे. नव्यानं परिचय झालेल्या व्यक्तींकडून आपण अनेक नवनवीन गोष्टी, संकल्पना शिकू शकतो. त्याचा एकूणच आपल्या वैचारिक प्रगल्भतेच्या वृद्धीच्या दृष्टीकोनातून खूप चांगला उपयोग होऊ शकतो.

## जंगलाच्या छायेत बारटांग बेट





ज्योतिर्मय साहित्य

बारटांगला पोहचल्यानंतर निसर्गाची खरी जादू सुरू होते एक बांधलेला घाट, त्यावर उभ्या असलेल्या विविध होड्या, आणि समोर दिसणाऱ्या दलदलीच्या विस्तीर्ण पाण्याचे दृश्य. पर्यंत जाण्याचा प्रवास हा फक्त नयनरम्य नसून, तो एक लयबद्ध अनुभव आहे. कधी छोट्या लाटांच्या नादात, तर कधी एका अरुंद नाल्यातून होडी पुढे जाते. सभोवतालचा शांत गूढपणा इतका खोल असतो, की मन नकळत अंतर्मुख होतं. येथे आणखी एक नयनरम्य असे दृश्य पाहायला मिळते. ते म्हणजे खारफुटीच्या जंगलाचे. त्यालाच असेही म्हणतात. ही झाडे एकमेकांच्या जवळ अगदी एकमेकात घुसून वाढली आहेत. त्यांची मुळे जमिनीवर एकत्र झालेली आपल्याला दिसतात. ही मुळे एवढी दाट आहेत की त्यांच्यात एखादा मनुष्य किंवा प्राणी अडकला तर त्याची सुटका होणे कठीण. परंतु असे सांगितले जाते की सुनामीच्या काळात याच जंगलांनी सुनामीचे आघात सोसल्यामुळे अंदमानचा इतर भाग सुरक्षित राहिला. पर्यावरणाचे रक्षण करणारे हे जंगल आहे.




थोडा वेळ होडीतून प्रवास केल्यानंतर सुरू होते ती एक जंगलात जाणारी पायवाट. झाडांमधून प्रकाशाच्या मनमोहक रेषा उमटलेल्या दिसतात. येथील हिरवळीच्या भागातून आपण एक ते दीड किलोमीटर चालत असतो. विविध प्रकारच्या पक्षी आणि प्राण्यांनी हे जंगल समृद्ध आहे. इथे थोडा वेळ जंगल भ्रमंती केल्यानंतर आपण पोहोचतो ते चुनखडीच्या गुहांमध्ये अर्थातच थंड, अंधाऱ्या, निसर्गाने लाखो वर्षांत रचलेल्या. यांची रचना म्हणजे जणू वेळेचा ठसा. एका पांढऱ्याशुभ्र, चंदेरी छायेत लपलेली ही गुहा आपल्याला निसर्गाच्या कलाकुसरीचं मौनातलं प्रदर्शन दाखवते. वेगवेगळ्या आकाराच्या या गुहा पाहणं म्हणजे एक अनोखी मेजवानी ठरते. निसर्गाचा हा चमत्कार आहे ! आपण जो आकार आपल्या मनाशी कल्पू, तो आकार आपल्याला गुहांमध्ये दृश्यमान होतो. बऱ्याचशा गुहांमध्ये अंधार आहे तर काही ठिकाणी वरून सूर्यप्रकाश आत येताना दिसतो. या गुहांमध्ये जाण्या येण्यासाठीचा रस्ता अतिशय अरुंद तर काही ठिकाणी निसरडा झालेला आहे. त्यामुळे चालताना काळजी घ्यावी लागते. आम्ही गेलो तेव्हा पर्यटकांची त्या ठिकाणी अतिशय गर्दी होती आणि आम्हाला काळजीपूर्वक पावले टाकावी लागत होती. इथे अंधार मात्र लवकर पडतो. त्यामुळे इथून वेळेतच बाहेर पडणे महत्त्वाचे असते. आपल्याला जर वेळ असेल आणि हवामान योग्य असेल, तर येथून जवळ असणारा बघायला जाता येतं जमिनीखालून वर येणारा गरम चिखल, सतत हालचाल करणारा, पण सौम्य तो पाहणं म्हणजे पृथ्वीच्या जिवंतपणाचा अनुभव घेणं.






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## स्वगुण परीक्षा (ड)

ज्योतिर्मय साहित्य

त्रिविधतापाची लक्षणे सांगणारे तीन श्लोक दिले आहेत आपण ते अर्थासह पाहूया.

१) देह,इंद्रिये, प्राण यांच्यामुळे जे सुखदुःख प्राप्त होते म्हणजे भोगावे लागले त्याला अध्यात्मिक ताप असे म्हणतात.

सर्व भुतांच्या संयोगाने जे सुखदुःख प्राप्त होते तो दुसरा ताप असुनतो मोठा क्लेशदायक आहे. तो आधिभौतिक ताप होय. श्लोक।।देहेंद्रियप्राणेन सुखं दुःखच प्राप्यते।इसमाध्यात्मिक तापं जायते दुःखं देहिना.


२)सर्व भूतेन संयोगात् सुख दुःखच जायते। द्वितीयतापसंताप:सत्यं चैवाधिभौतिक।।

३)शुभाशुभेन कर्मणा देहांते यमयातना। स्वर्गनरकादि भोक्तव्यमिदं चैवाधिदैविकम्।।

माणसाच्या चांगल्या वाईट कर्माप्रमाणे मेल्यावर यमयातना, स्वर्ग, नरक, वगैरे जे भोग भोगावे लागतात त्यांना आधिदैविक ताप म्हणतात.

अध्यात्मिक ताप–देह, इद्रिये व प्राण यांच्या योगाने माणूस सुखदुःख भोगतोत्रस्त होतो त्या तापाला आध्यात्मिक ताप म्हणतात. जे दुःख देहातून निर्माण होते आणि इंद्रिये व प्राण यांच्या द्वारे भोगावे लागते. पुढच्या चाळीस ओव्या मध्ये आध्यात्मिक तापाची व त्यामुळे होणारे दुःख याचे वर्णन केले आहे. समर्थाचे निरिक्षण आकलन व सभोवताली घडणाऱ्या घटना यांचे सुक्ष्म निरिक्षण, अवाढव्य व्यवहार ज्ञान आणि विलक्षण तेजोमय बुद्धी माझ्या सारखीला तर नतमस्तक होण्यास व जे वाड:मय आपल्यासाठी ठेवले ते अचंबित करणारे आहे असे म्हणावेसे वाटते.

(क्रमशः)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नाम कसे घ्यावे ?

ज्योतिर्मय साहित्य

नाम कसे घेऊ हे विचारणे म्हणजे, पेढा कसा खाऊ म्हणून विचारण्यासारखे आहे. पेढा कोणत्याही बाजूने खाल्ला तरी गोडच लागतो, तसे नाम कसेही घेतले तरी ते आपले काम करतेच करते. पेढा ज्याने खाल्ला आहे, तो पेढा कसा खाऊ म्हणून जसे विचारणार नाही, तसे नाम घेणारा मनुष्य नाम कसे घेऊ म्हणून विचारणार नाही. शेतात बी पेरतात तेव्हा त्याचे तोंड वरच्या बाजूला आहे की नाही हे पाहात नाहीत. बी शेतात पडते तेव्हा, ज्या तोंडातून मोड यायचा असतो ते तोंड कोणत्यातरी एका बाजूला, खाली किंवा वरही असू शकेल; पण जेव्हा मोड बाहेर पडतो तेव्हा त्याची दिशा मुळात कोणत्याही बाजूला असली तरी तो वळण घेऊन जमिनीतून वरच येतो. तसे, नाम कसेही घेतले तरी घेणार्याची ते योग्य दिशेने प्रगती करून त्याला योग्य मार्गावर आणून सोडील. म्हणून कसेही करून नाम घ्यावे.

नाम घेताना कोणती बैठक असावी, किंवा कोणते आसन घालावे ? हा प्रश्न म्हणजे श्वासोच्छवास करताना कोणत्या तर्हे ची बैठक असावी असे विचारण्यासारखा आहे. समजा, एखाद्याला दमा झाला आहे, तर तो काय करतो ? तो अशा तर्हेने बसण्याचा किंवा पडण्याचा प्रयत्न करतो की, जेणेकरून श्वासोच्छवास कष्टाशिवाय व्हायला मदत होईल; म्हणजे श्वासोच्छवास सुलभ रीतीने कसा चालेल, हे त्याचे ध्येय असते, आणि मग त्याकरिता देहाची बैठक कशीही ठेवावी लागली तरी चालते. श्वासोच्छवास विनाकष्ट चालू ठेवणे हे जसे त्याचे ध्येय असते तसे नाम अखंड कसे चालेल हे आपले ध्येय ठेवावे; आणि त्याला मदत होईल, व्यत्यय येणार नाही, अशा तर्हे ची कोणतीही बैठक असावी. बैठकीला फार महत्व देऊ नये. समजा, आपण पद्मासन घालून नामस्मरणाला बसलो आणि काही वेळाने पाठीला कळ लागली, तर आपले लक्ष नामापेक्षा देहाकडेच लागेल; म्हणजे नाम घेता घेता देहाचा विसर पडण्याऐवजी देहाची स्मृतीच वाढल्यासारखी होईल. म्हणून नामस्मरणात खंड न व्हावा हे ध्येय ठेवून, त्याला अनुकूल अशी ज्याच्या त्याच्या प्रकृतिधर्माप्रमाणे कोणतीही बैठक ठेवावी. भगवंताच्या नामाला शरीराचे कसलेही बंधन नाही. हेच तर नामाचे माहात्म्य आहे. मनुष्याच्या कोणत्याही अवस्थेमध्ये भगवंताचे स्मरण सहज ठेवता येण्याचे एकच साधन आहे आणि ते म्हणजे त्याचे नाम होय. पण देहबुद्धी अशी आहे की त्या निरूपाधिक नामाला आपण काही तरी उपाधी जोडतो आणि त्या उपाधीवर नाम घेणे अवलंबून ठेवतो; असे न करावे. इतर उपाधी सुखदुःख उत्पन्न करतील, पण नाम निरूपाधिक आनंद देईल.

शुध्द भावनेत आणि निष्ठेत खरे समाधान आहे; ही निष्ठा अनुसंधानाने उत्पन्न होते.

## ll संत - महात्म्य ll

संकलन : मधुकर बोरीकर
9403061886 (स्त्रोत:- इंटरनेट)

## संत जनाबाई

ज्योतिर्मय साहित्य

या काळात विकारांचा लय झालेला असतो. काम क्रोध,लोभ मद मोह दंभ हे संपविल्या जातात. जीवात्म्या समोरील विकारांचे मुळभ हटून आत्मसूर्याची किरणे स्वच्छपणे बुद्धीत पडतात. ही साधना दृढ व्हायला लागते. महानंदाचा डोह साधकांना अनुभवयास मिळतो, व ज्यावेळेस सविकल्प समाधी संपून



निर्विकल्प समाधीकडे साधकाचा उत्कर्ष होतो त्या स्थितीत,समाधी किंवा साधना अवस्था सोडली तरीही व्यवहारात असतानाही जिकडे जिकडे नजर जाईल तिकडे तिकडे दिसणाऱ्या जड चेतन भूतमात्र इत्यादी सर्वत्र चैतन्याचा दिव्य प्रकाश या डोळ्याने पाहता येतो. अशा स्थितीत जनाबाई म्हणतात मी वाम सव्य म्हणजे डाव्या किंवा उजव्या बाजूला कुठेही पाहू द्या मला तो परमात्मा चेतन रूपात दिसतो आहे. त्या कृष्णाचे चैतन्य रूप मला सर्वत्र स्पष्टपणे दिसते आहे. मी खाली पाहिले, मी वर पाहिले, आजूबाजूला पाहिले, मागे, पुढे पाहिले, कुठेही पहा तोच परमात्मा मला दिसत आहे.

म्हणून तुकाराम महाराज याच स्थितीचे वर्णन असे करतात की,

ऐसी विष्णूची नगरी । चतुर्भुज नर नारी ।
सुदर्शन घरटी करी । रीग न पुरे कळिकाळा ।।

नामदेव महाराजांची आरती याच प्रकारे आहे.

लाजले गे माय आता कवणा ओवाळू /आता कवणा ओवाळू/ जिकडे पहावे तिकडे/ जिकडे पहावे तिकडे /चतुर्भुज गोपाळू//

असा चेतन रूप परमात्मा चराचरात दिसण्यासाठी साधकाच्या अंगी प्रत्येक वेळा प्रचंड योगाग्नी धडधडत असायला हवा. तरच ही दिव्य अनुभूती अनुभवता येते.

चराचरी जे जे दिसे तेथे अविद्याची नासे असे जनाबाई म्हणतात. चेतन तत्व सर्वत्र भरून राहिल्यावर अविद्या म्हणजेच राग द्वेष मोह अस्मिता आणि अभिनिवेश हे भेद उरत नाहीत. बुद्धीच समत्व येते. सुखदुःख मी तू पण यातही समत्व येते. बुद्धीतील विवेक वैराग्यांग्नी प्रखर वाढतो. यामुळे मोह स्नेहादि क्लेषांची कटके जळून जातात. बुद्धी शक्ती निर्मळ, अतिसूक्ष्म होते. आत्म शक्तीची समता तिच्यात आली, प्राण मन अहंकार बुद्धीत व बुद्धी आत्मा कडे वळली तरच अशी स्थिती येते. अशा बुद्धीत ‘‘परम भक्ती‘‘ उत्पन्न होते.

मन हे विरून गेले असल्यामुळे मी तू पण हे आठवत नाही. आपपर भाव समाप्त होतो. व बुद्धी ही सद्बुद्धी होते. असा दिव्य सद्बुद्धीचा अनुभव संत जनाबाई यांना आला होता. तो त्यांनी सोप्या शब्दात आपणांस सांगितला. पण ज्या खोलीवर ज्या साधनेच्या उंचीवर, ज्या तपाने साध्य झालेल्या आणि गुरुकृपेने पूर्ण झालेल्या साधनेचा हा दिव्य अनुभव आहे, त्या मागची खडतर तपश्चर्या आपण ध्यानी घ्यावी, म्हणजे आपणास या दिव्य अनुभूतीची सर्वोच्च उंची लक्षात येईल. या थोर विभूतीस कोटिकोटी प्रणिपात करून हा लेख येथेच संपवितो. जय जय राम कृष्ण हरी.....

***



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**किं तेन हेमगिरिणा रजताद्रिणा वा**
**यत्राश्रिताश्च तरवस्तरवस्त एव।**
**मन्यामहे मलयमेव यदाश्रयेण**
**कङ्कोलनिम्बकुटजा अपि चन्दनाः स्युः ।।**

अर्थ – त्या स्वर्णीम किंवा चंदेरी पर्वतापासून काय लाभ, ज्याचे आश्रयी वृक्ष सामान्य वृक्षांसारखेच राहतात? आम्ही तर मलय पर्वतासच मानतो, ज्याच्या आश्रयाने दालचीनी, लिंब, कूटज हे सामान्य वृक्ष देखील चंदनासमान होतात.

जगात दोन प्रकारचे आश्रयदाते असतात. पहिला प्रकार म्हणजे हे लोक गरजूंना आश्रय देतात, पण त्यांच्या विकासाकडे लक्ष देत नाहीत. दुसरा प्रकार म्हणजे हे लोक गरजूंना आश्रय तर देतातच, पण त्याच सोबत त्यांच्या विकासाकडे देखील लक्ष देतात. किंबहुना ‘‘ आपणासारिखे करीती तात्काळ’’ म्हणजे त्या आश्रितांना देखील इतके विकसित करतात, ती त्यांनी गरजूंना आश्रय द्यावा. असा आशय या श्लोकातून अभिव्यक्त झाला आहे.




ज्योतिर्मय साहित्य

दशरथांच्या चारही मुलांचे शिक्षण पूर्ण झाले. ते परत आले.दशरथ आनंदित झाले साऱ्या जनतेचे प्रेम रामावर होते.एकदा सभेत विश्वामित्र आले त्यांचे स्वागत झाले.कसे आलात ?असे विचारले.ते म्हणाले आमच्या यज्ञात राक्षस विघ्न आणतात.रक्षणा साठी तुझ्या रामाला मागायला आलोय.दशरथाला हे करवेना.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

विश्वामित्र हे ऋषी होण्यापूर्वी एक पराक्रमी राजा होते एकदा ते फिर फिरत फिरत वशिष्ठ ऋषींच्या आश्रमात आले दुपारची वेळ होती आणि विश्वामित्रांना आणि त्यांच्या सोबत असणाऱ्या दहा हजार सैनिकांना भूक लागली होती सोबत अन्न घेतलेले नाही आता काय करावे अशा विवंचनेत असताना हा आश्रम दिसला म्हणून विश्वामित्र त्या आश्रमात गेले त्यांनी वशिष्ठ ऋषींना प्रणाम केला आणि जेवणाची व्यवस्था होईल का असे विचारले वशिष्ठ ऋषी म्हणाले हो हो काही काळजी नाही तुमची जेवणाची आणि रात्री मुक्कामाची पूर्ण व्यवस्था होईल विश्वामित्र त्यावर म्हणाले आहो मी एकटा नाही माझ्यासोबत माझं सैन्य आहे त्यावरही वशिष्ठ त्यांना म्हणाले की काही काळजी नाही तुम्ही कितीही जण या जेवणाची व्यवस्था मी करतो आणि खरोखरच दहा हजार सैनिक आणि विश्वामित्र यांची जेवणाची उत्तम व्यवस्था अगदी अल्प वेळेत वशिष्ठ ऋषींनी पूर्ण केली विश्वामित्रांना याचे आश्चर्य वाटत होते की या जंगलात कोणतीही साधन सामग्री नसताना अचानक इतक्या मोठ्या लोकांचा स्वयंपाक व शिफ्ट ऋषींनी कसा पार पडला असेल म्हणून त्यांनी दुसरे दिवशी वशिष्ठ ऋषींना हा प्रश्न केला त्यावर वशिष्ठ ऋषी म्हणाले माझ्या कडे कामधेनु गाय आहे ती माझ्या सर्व इच्छा पूर्ण करते आता विश्वामित्र ला ती गाय बळकाविण्याची इच्छा झाली त्यांनी वशिष्ठांना ती गाय देण्यास सांगितले पण वशिष्ठ ऋषी म्हणाले मी तुम्हालाही गाय देऊ शकत नाही विश्वामित्रांना राग आला व त्यांनी ती गाय बळेच ओढून न्यायला सुरुवात केली. (क्रमशः)




## कढीपत्त्याचा चहा आरोग्यासाठी खूप फायदेशीर

ज्योतिर्मय साहित्य

बहुतेक लोक विविध पदार्थांमध्ये कढीपत्ता भरपूर वापरतात. कढीपत्ता जेवणाची चव वाढवण्याचे काम करतो. सांबर, डाळ, भाज्या इत्यादींमध्ये कढीपत्ता प्रामुख्याने वापरला जातो.

एवढेच नाही तर लोक कढीपत्त्याचा रसही पितात. पण, आणखी एक गोष्ट आहे, जी तुम्ही या पानापासून बनवू आणि पिऊ शकता आणि ती म्हणजे कढीपत्त्यापासून बनवलेला हेल्दी चहा. होय, कढीपत्त्यापासून तयार केलेला चहा आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. कढीपत्त्यात अनेक प्रकारचे पोषक तत्व देखील असतात, जे अनेक प्रकारच्या शारीरिक समस्यांपासून बचाव करतात.

जाणून घेऊया कढीपत्त्याचा चहा पिण्याचे काय फायदे आहेत आणि तो बनवण्याची पद्धत कशी आहे.

कढीपत्त्यातील पोषक घटक –

कढीपत्त्यात लोह, फॉस्फरस, कॅल्शियम, व्हिटॅमिन ए (कॅरोटीन), व्हिटॅमिन सी इत्यादी अनेक प्रकारचे पोषक घटक असतात. व्हिटॅमिन सी रोगप्रतिकार शक्ती मजबूत करते. त्यामुळे कढीपत्त्याचा चहा पिणे तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकते.

कढीपत्ता चहाचे फायदे –

कढीपत्ता दक्षिण भारतात जास्त वापरला जातो. मात्र, आता बहुतांश लोकांनी त्याचा वापर सुरू केला आहे. कढीपत्त्याचा उपयोग फक्त फोडणी देण्यासाठीच केला जात नाही, तर या औषधी वनस्पतीपासून बनवलेला एक कप चहा देखील आपल्याला अनेक आरोग्यदायी फायदे देतो.

कढीपत्त्याचा चहा प्यायल्याने पचनक्रिया निरोगी राहते. त्यात सौम्य रेचक गुणधर्म आणि पाचक एंजाइम असतात, जे आतड्याची हालचाल सुधारतात. यामुळे पचनक्रियाही सुधारते.

बद्धकोष्ठता, गॅस, जुलाब आदी समस्याही कढीपत्त्याचा चहा प्यायल्याने कमी होतात.

जर तुम्हाला मधुमेह असेल आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवायची असेल तर तुम्ही कढीपत्ता चहाचे सेवन करू शकता. कढीपत्ता चहा रक्तातील साखरेची पातळी वाढवत नाही, साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी प्रभावी आहे.

कढीपत्त्यात उच्च पातळीचे फिनॉलिक्स आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात, जे मुक्त रॅडिकल्समुळे त्वचेच्या नुकसानापासून संरक्षण करतात. अँटिऑक्सिडंटमध्ये असलेले घटक शरीराला संसर्ग, जळजळ इत्यादीपासून सुरक्षित ठेवण्यासाठी देखील प्रभावी आहेत. आजारांपासून दूर राहायचे असेल तर एक कप कढीपत्त्याचा चहा नियमित घ्या.

तुम्ही गरोदरपणातही या चहाचे सेवन करू शकता. हा चहा प्यायल्याने तुम्हाला उलट्या, मळमळ, मॉर्निंग सिकनेस यासारख्या समस्यांचा त्रास होणार नाही. जर तुम्हाला मोशन सिकनेस असेल तर प्रवासापूर्वी आणि प्रवासादरम्यान हा चहा प्या, तुम्हाला उलट्या, मळमळ असा त्रास होणार नाही.

कढीपत्त्याचा सुगंध किंवा वास मज्जातंतूंना आराम देण्यास मदत करू शकतो. तणाव दूर करून मन आणि मेंदू शांत होतो. दिवसभर काम करून थकवा जाणवत असेल तर थकवा आणि तणाव दूर करण्यासाठी एक कप कढीपत्ता चहा प्या.


कढीपत्ता चहा कसा बनवायचा –


कढीपत्त्याचा चहा बनवण्यासाठी सुमारे २०–२५ ताजी कढीपत्ता पाने घ्या. त्यांना पाण्याने स्वच्छ करा. चहाच्या भांड्यात एक कप पाणी घाला आणि गॅसवर ठेवा. पाणी उकळायला लागल्यावर गॅस बंद करा.

आता त्यात कढीपत्ता टाका. थोडावेळ असेच झाकून ठेवा. गोडवा हवाच असल्यास थोडा गुळ वापरा, साखर नको. काही मिनिटांतच पाण्याचा रंग बदलू लागेल. चहा एका कपमध्ये गाळून घ्या आणि गरमागरम पिण्याचा आनंद घ्या.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## रवींद्रनाथ टागोर






विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२


## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

वाल्मिकी प्रतिभा हे नाटक अनेक अर्थांनी आगळेवेगळे आहे. वाल्या कोळी वाल्मिकी ऋषी होण्याआधी एक दरोडेखोर होता हे आपल्या सगळ्यांना माहिती आहे. ब्रह्मदेव आणि नारदांच्या आज्ञेनुसार त्यांनी रामायणाची रचना केली. परंतु ही रचना करण्याआधी त्यांनी क्रौंच पक्षाचे एक जोडपे एका झाडावर बसलेले पाहिले. त्या आपल्या आनंदात निमग्न असणाऱ्या एका पक्ष्याला एका शिकाऱ्याने बाण मारला. त्यामुळे त्या दुसऱ्या पक्ष्याचा विलाप पाहून वाल्मिकींचे हृदय द्रवले आणि त्यांच्या तोंडून रामायणातील तो प्रसिद्ध श्लोक बाहेर पडला.

मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ।
यत्क्रौंचमिथुनादेकमवधी काममोहितम् ।।

कधी नव्हे तो आपल्या तोंडून अशा प्रकारची सुंदर रचना कशी काय बाहेर पडली याचे त्यांना नवल वाटले. त्यानंतर त्यांनी ब्रम्हदेव आणि नारदांच्या आशीर्वादाने रामायणाची रचना केली हे आपल्या सगळ्यांना माहिती आहे. ही जी मूळ घटना आहे, ती रवींद्रनाथांना मान्य होती. पण आपल्या नाटकात त्या घटनेला त्यांनी वेगळीच कलाटणी दिली.

त्यांच्या वाल्मिकी प्रतिभा या नाटकात वाल्या आणि त्याचे साथीदार यांची दरोडेखोरांची एक टोळी असते. ही सगळी मंडळी अत्यंत क्रूर आणि आडदांड असतात. ते प्रतिभा नावाच्या एका निरागस मुलीला पकडून आणतात आणि कालीमातेपुढे तिचा बळी देण्याचं ठरवतात. या निष्पाप मुलीचा आक्रोश ऐकून वाल्याचे हृदय द्रवते. तो आपल्या साथीदारांशी वैर पत्करून तिची सुटका करतो. टोळीतील सहकाऱ्यांना सोडून देऊन तिला घेऊन रानोमाळ भटकतो. त्यातूनच त्याचे हृदयपरिवर्तन होते. तो स्वतः विषयी विचार करू लागतो. अंतरात्म्याचा शोध घेतो. त्याची ही तळमळ पाहून ती मुलगी म्हणजे प्रतिभा आपल्या खऱ्या रूपात त्याच्यासमोर प्रकट होते.

ती म्हणजे प्रत्यक्ष साहित्य, कला आणि विद्येची देवता सरस्वती असते. ती त्याला म्हणते, तुझ्यातील माणुसकी जागृत होते की नाही याची परीक्षा मी पाहिली. त्यासाठी मीच बालिकेचे रूप घेतले होते. तुझ्या पाषाणहृदयाला ज्या आर्त करुणेच्या स्वरांमुळे पाझर फुटला, त्याच तुझ्या हृदयातून आणि वाणीतून आता माणुसकीचे संगीत जन्म घेईल आणि लक्षावधी मनांना कोमल भावनांनी शुद्ध करेल. तुझी वाणी देशोदेशी चिरकाल घुमत राहील आणि त्यातून अनेक कवींना प्रेरणा मिळेल.

# महाराणा प्रताप ना कभी हारे;ना अकबर कभी जीता!

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

मेवाडचे महाराणा प्रतापसिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी,मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी २५ वर्षे तहान-भूक विसरून लढा दिला.मेवाडचे स्वतंत्र टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात कुठेही तोड नाही. प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावित झाला होता.त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानल्या जाते.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंह यांना आजही मोलाचे स्थान आहे.कारण महाराणा प्रताप यांच्या नावानेच त्याकाळी मुगल घाबरत असे. त्यामुळेच भारत भुमिला महाराणा प्रतापसिंहांचा मोठा अभिमान आहे.महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला.त्याच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह.मेवाड, बुंदेलखंड आणि सिरोही वंशातील काही राजे आपला स्वाभिमान,धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले. पुढे उदयसिंह मेवाडचे राजा झाले.चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षांनी दिनांक ३ मार्च १५७२ ला उदयसिंहांचे निधन झाले.यानंतर मेवाडचे संपूर्ण सुत्रे महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आले व त्यांचा राज्याभिषेक झाला.ज्यांचे नाव घेतल्याने सर्वांनाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप.महाराणा प्रतापांनी प्रतिकुल परिस्थितीतही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले.जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासुन आपल्या राज्याला धोका पोहोचू नये म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरिक केली.अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी मानसिंहाला मेवाडला जाण्यास सांगितले.त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात असताना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांच्या भेटीस गेला.महाराणा प्रताप यांनी त्यांचा आदरसत्कार केला.परंतु मानसिंगच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहाने याचे कारण विचारले.यावर महाराणा प्रताप म्हणाले स्वतःच्या समशेरच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी मोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात,अशा अस्वाभिमानी राजपुतांच्या पंक्तीला मी बसत नाही.मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ,राणा सांगा, ह्या सारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल.हे ऐकून मानसिंहाच्या मनात खटकले आणि महाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईल. असे म्हणून तेथुन निघुन गेला आणि मानसिंह व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले.ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रूपांतर झाली.राणाजींचे वक्तव्य नेहमीच मानसिंहाच्या मनाला खटकत होते. ही संपूर्ण घटना मानसिंहाने अकबराला सांगितली. पहिलेच मानसिंह तिलमिला झालेला होता आणि अकबराला मेवाड पाहिजे होते.याकरीता अकबर सर्वत्र जहर घोळण्याचे काम करीत होता.अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युद्ध करायला निघाला.ही बातमी महाराणा प्रतापसिंह यांना कळताच त्यांनी आपले बावीस हजार सैन्य घेऊन अरवली पर्वताच्या कुंभलगड वाटेने जाणाऱ्या मानसिंहाच्या सैन्यावर बाणांनी छुपे हल्ले करून बरेचसे सैनिक धाराशाही केले.दोन लाख सैन्याशी बावीस हजार सैन्य लढा देत होते.महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार तितक्यात सलिमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलिम वाचला.महाराणा प्रतापसिंहांच्या भितीने मानसिंह आपल्या सैन्यासह पिछाडीवर रहाला.हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले. राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करू लागले.महाराणा प्रतापसिंह जखमी झालेले पाहून मानसिंह अत्यंत दुःखी झाला. आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथुन निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली. प्रतापांचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले.मानसिंहाला महाराणा प्रतापसिंह समजून मोगलांनी आक्रमण केले.अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगतीरला प्राप्त झाले. तेवढ्यातच शत्रू सैनिकांनी राणाजींचा घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला.त्याचा पाय निकामी झाला.अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून व संपूर्ण वेढा चिरत दूर निघून गेला.वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दुर जाऊन चेतकने प्राण सोडला. आपला पाठलाग कोण करीत आहे हे पहाण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरून पहिले,तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तीसिंह व त्यांच्या बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता.राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले.यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला दादा तुझ्या सारखे शौर्य आणि कणखर मन यांच्या अभावामुळे मी जरी मोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे.या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली.मात्र अकबर महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करू शकला नाही.हल्दीघाटी हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानल्या जाते. प्रतापांना हरविण्यासाठी शेवटचा उपाय म्हणून अकबराने पराक्रमी योद्धा जगन्नाथला मोठ्या सेनेसह १५८४ मध्ये मेवाडवर आक्रमक करण्यास पाठविले.परंतु २ वर्षे अथक प्रयत्न करूनही तो महाराणा प्रतापसिंह यांना पकडू शकला नाही किंवा हरवू शकला नाही.अशाप्रकारे प्रबळ महत्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीर्तीवंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापसिंहाला शमविण्याचा प्रयत्न अकबराने केला पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.२१ जून १५७६ रोजी चेतकने (घोड्याने) महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला.आजही हल्दीघाटी येथील राजसमंद येथे चेतकची समाधी आहे.त्याकडे पहाणारे सर्वच प्रतापांच्या मूर्तीप्रमाणेच श्रध्देने पाहतात.१९ जानेवारी १५९७ रोजी महाराणा प्रतापसिंह यांची प्राणज्योत मावळली.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहाचे नाव राष्ट्र, धर्म, संस्कृती, स्वाभिमान यासाठी आजही मानाने घेतले जाते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत प्रतापांचे नाव अमर राहील.परमप्रतापी महाराणा प्रतापसिंहांना जयंती निमित्त कोटी-कोटी प्रणाम! जय हिंद!




रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर


# सर्वात मोठं नातं माणुसकीचं.....

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**


मी आज पाथर्डी आगाराच्या सकाळी ६:१५ ला निघणारी पाथर्डी- संभाजीनगर बस क्रमांक एम एच १४ बीटी ३७ ६० या बसमधून पाथर्डी ते संभाजीनगर असा प्रवास करत होतो. आज लग्न तिथी असल्यामुळे पब्लिक क्राऊड प्रचंड होती. बसमध्ये बसल्यानंतर लक्षात आले की बसला ज्या कंडक्टर होत्या त्या पाथर्डी मधीलच महिला कंडक्टर होत्या. त्यांनी सर्व प्रवाशांना तिकिटे दिली. पाथर्डी स्थानकावर बस स्टँडिंग झाली होती. पुढे जाऊन मला शेवगाव येथे जागा मिळाली. मला सीटवर एका महिलेच्या शेजारी मला जागा मिळाली. नंतर शेवगाव ते संभाजीनगर असा प्रवास सुरू झाला. मी पाहिले की माझ्या शेजारी बसलेल्या ताईच्या डोळ्यात पाणी होते. मी त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की मी माझी पर्स घरी विसरले आहे. मला अर्जंट घाटी दवाखान्यात जायचे आहे. माझे पती सिरीयस आहेत. आणि या गोंधळातच माझ्याकडून पैशाचे वॉलेट घरी विसरले आहे. माझ्याकडे मोबाईल नाही. काहीच नाही. याची जाणीव असतानाही मी बस मध्ये बसले. ती ताई मला सांगू लागली. मग मी वाहक वाहक मॅडमला सांगितले की सदर ताईचे वॉलेट घरी विसरलं आहे. त्यांचे पती दवाखान्यात ऍडमिट असून फार सिरीयस आहेत. त्यामुळे त्यांना याचच गाडीने जावे लागणार आहे. ही सर्व हकीगत मी कंडक्टर मॅडमला सांगितली.



कंडक्टरने जर त्यांना तिकीट नाही दिले तर मी तिकीट काढणार अशी मनाची तयारी मी केली होती. पण आश्चर्य त्या कंडक्टर मॅडमने कसलाही विचार न करता सदर महिलेला पाथर्डी ते संभाजीनगर तिकीट स्वतःच्या पैशाने काढून दिले. म्हणतात ना देव कुठे भेटू शकतो तशा कंडक्टर मॅडम त्या महिलेसाठी भेटल्या. पती सिरीयस आहेत. मॅडम मला देवासारख्या भेटल्या. आज दुसरा कोणी कंडक्टर असता तर मला उतरून दिले असते. ती महिला सर्वांसमोर आपल्या भावना व्यक्त करत होती. नंतर ती महिलामहिला कंडक्टर मॅडमला म्हणली की तुमचा नंबर द्या. मी तुम्हाला पैसे पाठवून देईल. तेव्हा मॅडम म्हणाल्या की ताई तुमच्या ठिकाणी माझी मोठी बहीण असती तर तिचे पैसे घेतले असते का? मला पैसे देऊ नका तुमच्या मिस्टरांना लवकर बर लागो ही देवाकडे मी प्रार्थना करीन. तुम्ही टेन्शन घेऊ नका. नंतर गाडी जवळ जवळ आली. मॅडम सर्व प्रवाशांना तिकिटे देत होत्या. गाडीत एवढे प्रवासी असतानाही त्या महिला वाहक कुठलीही चिडचिड न करता सर्व प्रवाशांना अगदी शांततेत हसून बोलून तिकिटे देत होत्या. काही प्रवाशांना विनंतीवरून त्यांच्या इच्छित स्थळी देखील सोडले. आज मला परिवहन महामंडळाच्या गाडीत वेगळाच अनुभव आला. समाधान वाटले की कुठेतरी अजून माणुसकी जिवंत आहे. बिडकीनच्या पुढे गाडी गेली असता मॅडमनी सर्व प्रवाशांना तिकीट दिले. तसेच त्यांचे राहिलेले सुट्टे पैसे देखील दिले. नंतर माझ्या शेजारी बसलेल्या ताईकडे आल्या आणि म्हणाल्या ताई हे अजून पन्नास रुपये घ्या. तुम्हाला रिक्षाला पैसे लागतील हे पाहून त्या माझ्या शेजारील ताई अजूनच भावुक होऊन रडू लागल्या. त्या का रडतात म्हणून आजूबाजूचे सर्व प्रवासी त्यांच्याकडे बघत होते. मग त्यांनी मॅडमनी केलेली मदत सांगितली सर्व प्रवासी मॅडमचे कौतुक करत होते. आणि काहीजण विचारत होते की मॅडम तुमच्याकडे तेवढे पैसे आहेत का की आम्ही मदत करू तुम्हाला. त्यावर मॅडम म्हणाल्या नाही माझ्याकडे पैसे आहेत मी त्या ताईला मदत केली आहे. तुमचे सर्वांचे खूप खूप धन्यवाद शेवटी गाडी संभाजीनगर च्या स्टॅन्ड वर आली. माझ्या शेजारील स्त्री आणि सर्व प्रवासी खाली उतरलो. त्या ताईच्या डोळ्यात पाणी होते. आणि तिने मॅडमला घट्ट अशी मिठी मारली आणि मॅडमचे आभार मानले हे बघून मी सुद्धा भाऊक झालो. संभाजीनगर बस स्टॅन्ड वर उतरल्यानंतर मी वाहक मॅडम यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सांगण्यासही नकार दिला. मी माझ्या तिकिटावर त्यांचे नाव पाहिले आणि माझ्या शेजारी बसलेल्या त्या ताईचे देखील तिकीट घेतले. आणि त्याचा फोटो काढून घेतला. त्या मॅडमचे नाव तिकिटावर आर डी आबूज असे होते. हे मला तिकीट वाचून समजले. मी माझे आणि त्या ताईचे दोन्हीही तिकिटांचे फोटो आपणास पाठवत आहे. आज खूप दिवसांनी मी बसमध्ये प्रवास केला आणि त्या वाहक मॅडमचा मला खूप अभिमान वाटला.

***


दत्ता पवार





# ज्येष्ठ साहित्यिक विश्वास देशपांडे यांना साहित्य कलारत्न राष्ट्रीय पुरस्कार

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**शिर्डी** – शांतीकमल ओम साई विकास प्रतिष्ठान व बी.बी.सी. फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य निर्मित साई कलारत्न समाजभूषण पुरस्कार २०२५ पुरस्कार सोहळ्याचे आयोजन शिर्डी येथे नुकतेच करण्यात आले होते. या कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक विश्वास देशपांडे यांना साहित्य क्षेत्रातील दिलेल्या योगदानाबद्दल हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

त्यांना मानाचा फेटा, सन्मानपत्र, शिल्ड आणि मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. या भव्य व दिव्य पुरस्कार सोहळ्यास प्रसिध्द हॉटेल व्यवसायिक व समाज सेवक. किशोर कालडा शेठ संगमनेर, दिग्दर्शक अल्ताफ शेख पुणे, व प्रेम मराठी चित्रपट दिग्दर्शक सुदाम संसारे वंदना गव्हाणे अभिनेत्री आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.



# शिक्षणातून शांततेकडे : मौलाना गुलाम मोहम्मद वस्तानवी यांचा समर्पित प्रवास...

**ज्योतिर्मय साहित्य**

"आपलं असणं केवळ स्वतःपुरतं न राहता, इतरांच्या आयुष्यात पथदर्शक प्रकाश बनणं, हाच खरा धर्म आहे," हे वाक्य मौलाना वस्तानवी यांच्या आयुष्याचं सार आहे असे म्हणता येईल. एका साध्या घरातून आलेले, पण विचाराने प्रगल्भ, मनाने विशाल आणि कृतीने महान असणारे हे व्यक्तिमत्त्व आपल्या कर्तृत्वामुळे आजही लाखो- करोडो भारतीयांसाठी प्रेरणास्रोत म्हणून हृदयात जिवंत आहेत.

यूं अचानक हमे गमजदा कर गये
बीच रास्ते से हम को जुदा कर गये !
हमसे क्यू खुद को यु छुपा कर गये
बे तहाशा हमे क्यू रुला कर गये !!

मौलाना गुलाम मोहम्मद सहाब

वस्तानवीचं जीवन कुठल्याही पुरस्काराने किंवा पदवीने मोजता येणार नाही; त्यांचे सामाजिक, धार्मिक तसेच विज्ञानवादी कार्य हे आत्म्याला स्पर्श करणारे आहे. ते एक महान प्रतिभावान व्यक्तिमत्व होते ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य अध्यात्मिक सेवेत समाजाच्या सुधारणा आणि कल्याणासाठी समर्पित केले ; त्यांना ना प्रसिद्धीची हाव होती ना कधी त्यांनी दिखावा केला. लाखो लोकांच्या कल्याणाचे ते एक माध्यम होते. भाविकांसाठी मस्जिदच्या पायाभरणीपासून ते गरजू रूग्णांना हॉस्पिटलच्या बेड पर्यंत त्यांनी इमाने- इतबारे सेवा दिली. भारतातील पहिल्या अल्पसंख्याक मेडिकल कॉलेजची स्थापना त्यांनी जालना जिल्ह्यातील बदनापूर येथे केली हे विशेष. आज हजारो रुग्णांना तेथे मोफत सेवा दिली जाते. या हॉस्पीटल मध्ये रुग्ण कोणत्या जातीचा, धर्माचा व पंथाचा आहे याचा विचार न करता त्याला एक माणूस म्हणून पाहिलं जातं व माणुसकीचा व राष्ट्रीय एकात्मतेचा हेतू अबाधित ठेवण्याचे कार्य केलं जातं. याचे सर्व श्रेय अर्थातच मौलाना गुलाम वस्तानवी साहेब यांना जाते. आज संपूर्ण जग जणू युद्धभूमी बनले आहे. देशप्रेम असलेले मौलाना साहेब नेहमीच भारतामध्ये सुख, समृद्धी, अमन, भाईचारा तसेच विश्वामध्ये शांतता प्रस्थापित हो, सर्व देशांच्या नेत्यांना सद्बुद्धी लाभो यासाठी नेहमीच अल्लाह समोर नतमस्तक होऊन ते दुआ (प्रार्थना) करत असत.

१ जून १९५० रोजी गुजरातमधील सूरत जिल्ह्यातील कोसाडी या छोट्याशा गावात त्यांचा जन्म झाला. बालपणापासूनच कुरआनचे शिक्षण घेत त्यांनी "हाफिज-ए-कुरआन" होण्याचा मान मिळवला. त्यांच्या नावामधील 'वस्तानवी' ही ओळख त्यांचे वतन असलेल्या 'वस्तान' गावामुळे निर्माण झाली. बालपणापासूनच शिक्षणाची ओढ आणि धार्मिक सेवाभाव वृत्ती त्यांच्या अंगी होती.

वस्तानवी साहेबांनी फक्त पारंपरिक शिक्षणाचाच नव्हे तर आधुनिक शिक्षणाचाही प्रचार , प्रसार केला. त्यांनी एम.बी.ए.ची पदवी घेतली आणि त्यातून व्यवस्थापन कौशल्यांचा उपयोग शैक्षणिक संस्थांच्या उभारणीत केला.

मौलाना गुलाम मोहम्मद वस्तानवी साहेबांचा सर्वात मोठा विशेष म्हणजे त्यांचा समाजाप्रती असलेला सर्वसमावेशक दृष्टिकोन. पारंपरिक धार्मिक शिक्षणात त्यांनी आधुनिक शिक्षणाची जोड दिली. त्यांच्या मतानुसार, "मुलं फक्त मौलवी किंवा धर्मगुरू न बनता डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक आणि समाजसुधारक देखील बनली पाहिजेत." हीच धारणा घेऊन त्यांनी अकलकुवा (महाराष्ट्र) येथे "जमिआ इस्लामिया इशाअतुल उलूम" या संस्थेची स्थापना केली. याच संस्थेअंतर्गत त्यांनी भारतातील पहिल्या अल्पसंख्यांक मेडिकल कॉलेज ची स्थापना केली व त्याचबरोबर इंजिनिअरिंग कॉलेज, फार्मसी, बी.एड., डी.एड., आय.टी.आय., आयआयटी, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट व महिला शिक्षणासाठी स्वतंत्र व्यवस्था यासारख्या सुविधा निर्माण केल्या. हे सर्व करताना त्यांचा हेतू एकच मुस्लिम समाजाला आत्मनिर्भर, प्रगत आणि समरस बनवणे व देशाच्या विकासाला हातभार लावणे. उल्लेखनीय बाब म्हणजे कश्मीर पासून ते कन्याकुमारी पर्यंत या संस्थेचा विस्तार आहे.



धर्माच्या पलीकडचे समाजकार्य

मौलाना वस्तानवी साहेब केवळ धार्मिक गुरू नव्हते ते एक जागरूक समाजसुधारक होते. त्यांनी अनाथ, गरीब, दलित, वंचित विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर वस्तीगृह निर्माण केले, शिष्यवृत्ती दिल्या, व रोजगार प्रशिक्षण यांचेही यशस्वी आयोजन केले. जे गरजूवंत विद्यार्थी आहेत अशा अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी फिस सुद्धा माफ केली. विशेष म्हणजे त्यांनी अनाथ विद्यार्थ्यांसाठी तसेच विधवा महिलांना आर्थिक आधार देण्यासाठी "मासिक पगार" सुरू केले व अनेक ठिकाणी विहिरी बोअरवेलचे निर्माण करून लोकांच्या पाण्याचा प्रश्न सोडविला. असा उदात्त विचार फक्त एक अवलियाच करू शकतो. त्यांच्या खिदमत-ए-खल्क (जनसेवा) या भावनेतून हजारो कुटुंबांना आधार मिळाला.

ही सर्व माझी मुलं आहेत

मौलाना गुलाम मोहम्मद वस्तानवी साहेब कोणत्याही मुलाकडे धर्म, जात, आर्थिक पार्श्वभूमी यावरून बघत नसत. त्यांच्या दृष्टीने, प्रत्येक विद्यार्थी म्हणजे आपला मुलगा किंवा मुलगीच. अनाथ, गरीब, वंचित मुलांवर त्यांनी जे प्रेम केलं, ती केवळ सहानुभूती नव्हे, तर त्या मुलांच्या स्वप्नांना पंख देणारी वटवृक्षाची सावली होती.

प्रत्येक कार्यक्रमात ते म्हणत असे की, "ही सर्व माझी मुलं आहेत." हे शब्द त्या विद्यार्थ्यांसाठी केवळ आश्वासन नव्हते, तर आयुष्यभराची हमी होती की, "तुम्ही एकटे नाही आहात."

समाजाच्या आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी काही व्यक्ती जन्माला येतात, ज्या केवळ आपले जीवन जगत नाहीत, तर त्या समाजाचं, शिक्षणाचं आणि संस्कृतीचं जणू एक जिवंत ग्रंथ बनतात. मौलाना गुलाम मोहम्मद वस्तानवी हे अशा दुर्मिळ विभूतींपैकी एक होते. त्यांना "चालतं फिरतं विद्यापीठ" म्हणणं ही केवळ उपमा नाही, तर त्यांच्या जीवनकार्याची यथार्थ ओळख आहे.

मौलाना साहेबांचं संपूर्ण आयुष्य शिक्षणप्रसार, धार्मिक प्रबोधन आणि सामाजिक उन्नतीसाठी वाहिलं गेलं. त्यांनी उभारलेल्या संस्था म्हणजे केवळ शाळा किंवा मदरसे नव्हे, तर मूल्यांची, विवेकाची आणि परिवर्तनाची पाठशाळा होती. त्यांच्या विचारांचा, अनुभवाचा आणि दृष्टिकोनाचा परीघ इतका विस्तृत होता की विद्यार्थ्यांपासून ते विचारवंतां पर्यंत सर्वांनी त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

**श्रद्धांजली...**

**प्रा. डॉ. आरिफ ताजुद्दीन शेख, बाभुळगाव, मो. 70202 68471**

त्यांच्या निधनानंतर निर्माण झालेली रिकामी जागा केवळ एखाद्या व्यक्तीची नाही, तर ती एक चालती बोलती शिक्षण संस्कृती हरवल्यासारखी आहे. त्यांचं जाणं म्हणजे, जणू एखादे प्रकाशस्तंभ विझण्यासारखे आहे. त्यांच्या इशलोकी जाण्याने अनेकांना दिशा देणारा आवाज थांबला. समाजातील उपेक्षित, दुर्बल घटकांना सशक्त करणारा हात मागे हटला.

त्यांनी उभारलेली "जामिआ इशाअतुल उलूम, अकलकुवा" ही संस्था आज शेकडो नव्हे, हजारो विद्यार्थ्यांसाठी एक नवा प्रकाशमार्ग आहे. या संस्थेमध्ये त्यांनी पारंपरिक इस्लामी शिक्षणाबरोबरच आधुनिक शिक्षणाचा संगम घडवला. डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, आणि विचारवंत घडवणाऱ्या या शिक्षणसम्राटाच्या जाण्याने समाजाचे खूप मोठे नुकसान झाले आहे.

इथे एक महत्त्वपूर्ण गोष्ट नमूद करावीशी वाटते की,

मौलाना गुलाम सहाब वस्तानवी यांच्या नावावर व त्यांच्या मुलांच्या नावावर ना घर आहे ना जमीन, बंगला गाडी . एकदा मौलाना हुजेफा म्हणजे त्यांचे चिरंजीव म्हणाले, माझे लग्न होऊन काही दिवस झाले होते.मी व मौलाना प्रवासात होतो. ड्रायव्हरने गाडी पेट्रोल पंपावर नेऊन उभी केली. ड्रायव्हरने मौलानाला विचारले डिझेल टाकायचा आहे पैसे पाहिजे तेव्हा मौलाना गुलाम मोहम्मद वस्तानवी म्हणाले माझ्या खिशात एकही रूपया नाही. मौलानाने त्यांच्या मुलाला विचारले पैसे आहे का? तेव्हा त्यांनी खिसे चाचपडले तेव्हा त्यांच्याही खिशात एकही रूपया मिळाला नाही . मौलाना हुजेफा यांनी त्यांच्या आईला विचारले तुमच्याकडे काही पैसे आहे का तेव्हा त्यांनी पाहिले तर पाचशे रुपये निघाले त्या पाचशे रुपयाचे डिझेल त्यांनी टाकले व पुढे गाडी निघाली. या प्रसंगानंतर मौलाना गुलाम साहब वस्तानवी यांनी गाडी थांबवली आणि त्यांच्या मुलाला सांगितले "मला आनंद होत आहे की ,तुझ्या खिशात एक रुपया मिळाला नाही म्हणजे तुझ्या मनामध्ये *(तुम्हारे दिल मे दुनिया की मोहब्बत नही इस बात कि बहुत खुशी होती है* ) सुद्धा दुनियादारी नाही याचा मला आनंद होत आहे" अशी माणसं जगात शोधूनही सापडणार नाही याचा खरंच हेवा वाटावा तेवढा थोडा आहे.

आज जेव्हा आपण शिक्षणाच्या बाजारीकरणा बद्दल बोलतो, तेव्हा मौलाना वस्तानवीसारख्या लोकांनी दिलेल्या नि:स्वार्थ शिक्षणसेवेची उणीव अधिक तीव्रतेने जाणवते. त्यांनी कोणतीही पदे किंवा प्रतिष्ठा न मागता जे कार्य उभं केलं, ते खरं तर एका राजकीय नेतृत्व करणाऱ्यांच्या कामगिरीला लाजवेल असं आहे.

त्यांच्या जाण्याने फक्त मुस्लिम समाजालाच नव्हे, तर संपूर्ण भारताला एक शैक्षणिक, सामाजिक, आध्यात्मिक दीपस्तंभ गमवावा लागला आहे. ही हानी कुठल्याही योजनांनी किंवा निधीने भरून न निघणारी आहे, कारण अशा विभूतींना पर्याय नसतो.

आज त्यांच्या कार्याची सावली आपल्यावर आहे, परंतु त्यांची जागा कोणी घेऊ शकत नाही. त्यांनी दिलेले मूल्य, दृष्टिकोन आणि आत्मविश्वासाची शिकवण ही आपल्यासाठी एक अमूल्य ठेवा आहे.

अल्लाह त्यांना जन्नतुल फिरदौसमध्ये उंच स्थान देवो आणि त्यांच्या कार्याला पुढे नेणारे, त्यांचा वारसा जपणारे विद्यार्थी आणि नेतृत्व समाजाला लाभो, हीच खरी श्रद्धांजली ठरेल.

भारतीय इस्लामी शिक्षण व सामाजिक जागृतीचा उजळता प्रकाश असलेले मौलाना गुलाम मोहम्मद वस्तानवी हे नाव आता इतिहासात अजरामर झाले आहे. त्यांच्या निधनाने एक युग संपले, पण त्यांच्या कार्यातून अनंत जीवन फुलले.

४ मे २०२५ रोजी त्यांच्या निधनाने भारतीय मुस्लिम समाजाने एक असा मार्गदर्शक गमावला, जो शिक्षण, आधुनिकता, धर्म, समाज आणि राष्ट्रीय एकात्मतेचा सेतु होता. त्यांचा मृत्यू म्हणजे न भरून निघणारी हानी आहे

एक युग संपले, एक विचार जिवंत राहिला...

# बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक भगीरथ : कर्मवीर भाऊराव पाटील

**ज्योतिर्मय साहित्य**

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज पुण्यतिथी. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्यामनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्वना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सदगुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, ( २७ मुलींसाठी ) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, ( १ मुलींसाठी ) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी ) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची पुण्यतिथी. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!






श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# सहकार्याचे अज्ञान पक्ष्याच्या जीवावर......

**ज्योतिर्मय साहित्य**



पशुवैद्यकीय दवाखान्यात सेवा करतांना प्रामाणिक तेचं फळ कधीना कधी मिळत असतं ! एका प्रकारात सच्ची कौशल्य, सेवा वृती बाळगणाऱ्या सहकार्या कडून नकळत चुक झाली पण ती शवचिकित्से अंती निर्दोषी असल्याचे एक निष्पन्न झाले होते.

दुसऱ्या एका सहकार्या कडून बावळटपणा व अज्ञानी वृतीमुळे त्याची बदनामी ही झाली. पण मी केलेल्या प्रामाणिकतेमुळे सहकाऱ्याच्या मोठ्या चुकावर पांघरुन घालण्यात यश आले. व खात्याच्या बदनामीला वाचवण्यात यश मिळाले.

नोव्हेंबर- डिसेंबर चा महिना असेल.जानेवारी महिन्याच्या काळात पोल्ट्री पक्ष्यात मानमोडी (आर.डी.)

विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव होतो. व त्यात लागण झालेले बहूतांषी पक्षी दगावतात. त्या मुळे डिसेंबर महिन्यात आर.डी. प्रतिबंधक लस मागवली जाते. व त्याचे मोठ्या प्रमाणात लसीकरण करण्यात येते.

माझ्या अंतर्गत असलेल्या स्व. श्री. सय्यद हषमी प.ध.प. याला कंधारच्या छोटी गल्ली, कोर्ट बाजार, नवरंगपुरा या मुस्लिम बहूल वस्तीत घरोघर जाऊन लसीकरण करण्याच्या सूचना दिल्या. त्या नुसार त्याने सकाळी सात वाजता संस्थेतून लस हस्तगत करुन

घरोघर जाऊन लसीकरण केले.

त्यात ऐका व्यक्तीने टर्की जातीचे दहा पक्षी हैद्राबाद येथून खरेदी करुन आणले होते. प.ध.प. श्री.सय्यद हषमी यांनी त्या सर्व पक्षांना लसीकरण केले.पण तासा भरात सर्वच ते टर्की पक्षी दगावले. कांही वेळा नंतर ती व्यक्ती अर्ज घेऊन दवाखान्यात आला व मोठ्या आवाजात सय्यद हषमी ला भांडत होती व नुकसान भरपाईची मागणी वारंवार करत होता. मला काय प्रकार आहे हेच समजत नव्हते. मला पाहताच तो पशुपालक नार्मल झाला. कारण मी सहा महिन्यापुर्वी त्याच्या म्हैशी चे ऑपरेशन करुन पोटातून लोखंडी तार काढून जीव वाचवला होता. मी व माझे मित्र डॉ.पद्मवार दोघांनी बोलून त्या पक्षी धारकाला शांत करणयात यश मिळवले होते. डॉ.पद्मवारने समोरच्या व्यक्तीला



पशु वैद्यकीयच्या
**आठवणी...**
**श्याम वा. कुलकर्णी, पुणे**
**मो. 98238 09656**

शाब्दीक कौशल्य दाखवत शांत केले होते. डॉ.पद्मवार मुख्यालयी न राहता संभाषण चातुर्य दाखवत समोरच्या व्यक्तीला गप्प करण्यात त्याच्या इतका चतुर मित्र सापडणे जवळ पास दुर्मिळच...! कारण डॉ.पद्मवार यांनी संपूर्ण सेवा मुख्यालयी न राहता १०० कि.मी.पर्यंत अंतरावरील संस्थेत कौशल्ये पूर्वक पूर्ण केली. शासनाने "विनातक्रार सेवेचा" पुरस्कारच त्याला द्यायला हवा होता.

तक्रार धारक घरी परतल्यावर सय्यद हाषमी ला काय प्रकार झाला याची चौकशी केली. त्याची लसीकरण केलेली बाटली तपासली. त्यात पिवळसर रंगाचे लसीचे द्रावण तपासले. व स.हाषमीला पिवळसर रंगा विषयी विचारणा केली.तेंव्हा तो म्हणाला मी लसीच्या द्रावणात १० मी.ली. . हे प्रतिजैविक मिसळले होते. औषध मिसळण्या चे कारण त्याला विचारले तेंव्हा तो म्हणाला "साब, बहुत आसानसा तरिका है, मूर्गीयाँ मे कुछ बिमार मूर्गीयाँ के लिए इंजे. जान बचने का काम करता है और जो बिमार नही है, उसे व्हॅक्सीन जान बचाने का काम करता है!" हे ऐकताच मी अचंबित झालो. मनातील हस्याची लहर दाबत सर्व प्रकर पहात होतो.

पक्षी धारकाला व्यवस्थित समजवल्या मुळे व पुर्वी त्याच्या म्हैसीची व्यवस्थित शस्त्रक्रीया करुन प्राण वाचवले होते.त्यामुळे तो वाद तेथेच मिटला गेला. व भविष्यात कोणते ही औषध लसीच्या द्रावणात प्रतिजैवक औषधी मिसळणार नाही असे हमी पत्र सय्यद हाषमी कडून लिहून घेतले होते. व झालेला प्रकार वरिष्ठ जिल्हा पशुसंवर्धन अधिकार्यांना सांगून सय्यद हाषमीचे नांव उजळणी प्रशिक्षणासाठी प्रस्तावित केले होते...

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत)
E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559